म.वि.प्र.समाज नाशिक ,
श्रीमती विमालाबेन खिमजी तेजुकाया,
कला ,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्‌यालय,
देवळाली कॅम्प , नाशिक

# विषय -



# मह ांचे पद्‌य वाङमय

प्रा.दिलीप जाधव

मराठी विभाग प्रमुख

- आद्‌य कवयित्री महदंबा – धवळे
- मुर्तिप्रकाश
- सातीग्रंथ- रुक्मिणी स्वयंवर, उद्‌धवगीता, वछाहरण, ज्ञानप्रबोध, सह्याद्रिवर्णन, श्रीऋद्‌धिपूरवर्णन

# महदंबा/महदाइसा

- महदंबा – व्यक्तिगत जीवन
- गोविन्द्प्रभूंच्या सहवासात काव्य स्फूर्ती
- कलासंपन्न व्यक्तिमत्व
- धवळे पूर्वार्ध- शके १२०९ पूर्वी
- धवळे उत्तरार्ध- शके १२३४ च्या पूर्वी

- कृष्णाला पाहिल्यावर रुक्मिणीची अवस्था

‘सौन्दर श्रीकृष्ण देखियेला झळकता
तव तियेचे आकर्षिले चीत्
कैसे संभ्रमीत् जाली माडांवरुनिया घालू पाहे झेप
तवं वीप्रे सांवरली बाळी म्हणे देवी नव्हे
तमचे उचीत ’

# महदंबेच्याच्या  कवितेचे विशेष

- प्रसंग चित्रण व व्यक्तिचित्रण या दोन्हीच्या बाबतीत एक अकृत्रिम साधेपणा
- प्रारंभापासून शेवटपर्यंत एक गतिमानता
- अनेक प्रसंगांची कौशल्याने गुंफण
- पाल्हाळ नाही, फाफटपसारा नाही,
- शृंगाराला जवळपासही फिरकू दिले नाही

# मुर्तिप्रकाश (शके १२११)

- केसोबासांचा तिसरा महत्वाचा ग्रंथ
- कालदृष्ट्या साती ग्रंथांच्या अगोदरचा
- वर्णनपर ग्रंथ, ओवीसंख्या सुमारे ३०००
- श्री चक्रधरांची मूर्ती हा मुख्य वर्ण्य विषय
- डोमेग्राम येथील पुजावसराच्या प्रसंगाधारे वर्णन
- डोमेग्रामचे वर्णनही विस्ताराने केले आहे.

# मुर्तिप्रकाशाचे स्वरूप व शैली

- या ग्रंथात तत्वचर्चा अनेक ठिकाणी असली तरी ग्रंथ निरस झालेला नाही. साधे मूर्ती वर्णनच पण ते भावपूर्ण अंत: करणाने केलेले असल्याने त्यास अवीट गोडी प्राप्त .
- “ साहित्यांचा सेजारी : सुख श्रिघारेसी गोष्टी करी :

म्हणे धन्य धन्य ते वैखरी : जे देवा दुर्लभ ||

ऐसी कवितेची चाली सुरंग सरळ : जैसे अनुराग ज्ञान केवळ :

तैसे शब्द दिसती पदी प्रांजळ : अर्थपुष्ट ||

ब्रह्मविद्येचा आरीसां : उमटे कैवल्याचा ठसा :

तो दृष्ट करीन राजहंसा : रसाळाशी

# महानुभावीयांचे पद्य वाङ् मय (साती ग्रंथ)

- रुक्मिणीस्वयंवर – नरेंद्र शके १२१४
- शिशुपालवध – भास्करभट बोरीकर शके १२३५
- एकादशस्कंध ( उद्धवगीता ) – भास्करभट बोरीकर शके १२३६
- वछाहरण – दामोदर पंडित शके १२३८
- ज्ञानप्रबोध – पंडित विश्वनाथ शके १२५३
- सह्याद्रिवर्णन – रवळोव्यास

# रुक्मिणीस्वयंवर – नरेंद्र

- साती ग्रंथात कालदृष्ट्या पहिला क्रमांक
- मूळ ग्रंथ १८०० ओव्यांचा असला तरी उपलब्ध ओवीसंख्या ८७९
- कलासंपन्न व रसपूर्ण ग्रंथ
- “ मराठी शारदेच्या अंगावर चढवलेले एक दिव्य लेणे आहे”
- रुक्मिणीच्या श्रीकृष्णावरील भक्तियुक्त प्रीतीचे विदग्ध दर्शन
- ‘ ते देवांचे सौंदर्य वानु कैसे : जे मदनु अपत्य लाहिला आपैसे

  रूपाचा वेधु नारीसि असे: तैसाचि मुनीश्वरां ।’

# रुक्मिणीस्वयंवर – नरेंद्र

- किन्नराच्या तोंडून श्रीकृष्णाचे सौंदर्य वर्णन रुक्मिणी ऐकते आणि विरहाने अस्वस्थ होते
- तिच्या विर्हव्र उपचार करण्यासाठी अनेक शीतलोपचारांची योजना
- पण विरह सहन न होऊन- आपल्या सखीला ती म्हणते

‘ तया मी शरण सर्वभावी : तनु-मन –प्राण अर्पिले देवी |
तो माझिया जीविताचा गोसावी : रावो यादवांचा |’

# रुक्मिणीस्वयंवर – नरेंद्र

- सद्भिरुचीच्या  मर्यादा –
- “ एकेका अवेवाचे बरवेपण | बोलतां विषयाचे होईल माजवण |

  पुन साधूंचे घडेल दूषण| जऱ्ही मुनी जाले |
- रसिकता, उदात्तता यांचा सुंदर संयोग
- कल्पनाविलासाचे सामर्थ्य
- “ डावा हातु उसिसां घातला : उजवा हृदयावरी ठेविला

  जैसा जिवेंसी देवो धरिला :निसटैल म्हणौनि |”

# रुक्मिणीस्वयंवर – नरेंद्र

- श्रीकृष्ण कथेचे लेखन जरी असले तरी पंथीय तत्वज्ञान मात्र या ग्रंथात कुठेही आलेले नाही.
- कवित्वाच्या विदग्ध जाणीवेतून हे काव्य लिहिलेले.
- नरेंद्राने पंथाची दीक्षा घेण्यापूर्वी हे काव्य निर्माण झालेले.
- प्रबंध काव्याचे तीन विशेष नरेंद्रच्या या काव्यात उतरलेले.
- नरेंद्राची भूमिका भक्तापेक्षा रसिक कवीचीच अधिक आहे.
- रा.चिं.ढेरे – ‘ जीवनाचा अनुभव डोळसपणे घेऊन त्याचा गाभा शोधू पाहणारी , जीवनाचा वेध घेऊ शकणारी दृष्टी जर नरेंद्रास लाभली असती , तर त्याने एकीकडे कालीदासाशी पैजा मारल्या असत्या आणि दुसरीकडे भक्तिप्रवणतेमुळे ज्ञानेश्वराशी जवळीक साधली असती’

# शिशुपालवध – भास्करभट बोरीकर

- भास्करभट बोरीकर, मूळ नाव भानुभट, वैदिक पंडित होता,
- बाईदेवव्यासानंतर पंथाचा तिसरा आचार्य होण्याचा बहुमान.
- १०८७ ओव्यांच्या या काव्यात सुरुवातीला आपल्या काव्याचे स्वरुपवर्णन करताना तो म्हणतो –

  “ म्हणौनि शिशुपालवधी कथा : जे भक्तिरसाची त्रिपथा

  किं सोनवै कैवल्यपथा : पाजळिली

भक्ती आणि शांत या रसांचा आस्वाद घडवणारी काव्यसृष्टी कवीला निर्माण करावयाची आहे, पण प्रत्यक्ष काव्यात मात्र शृंगार रसाचाच आविष्कार जास्त प्रभावी होत गेला.

# शिशुपालवध – भास्करभट बोरीकर

- आचार्य बाईदेवव्यासांनी शिशुपालवधाला पंथाच्या दृष्टीने नापसंती दर्शवली.
- तत्वदर्शनापेक्षा पांडित्य, रसिकता आणि आत्यंतिक शृंगारासक्ती यांचेच दर्शन अधिक घडते.
- संस्कृत महाकाव्यातील काव्यगुणांच्या अनुकरणाची इर्षा प्रकर्षाने जाणवते.
- हास्यरसाचा किंवा विनोदाचा एक धागा
- भास्करभटाचा साहित्यशास्त्रीय दृष्टीकोण म्हणून हा ग्रंथ महत्वाचा .

# एकादशस्कंध ( उद्धवगीता ) – भास्करभट बोरीकर

- रचना शके १२३६ ,इ.स. १३१४, ओवीसंख्या – ८२७
- आचार्य बाईदेवव्यासांनी शिशुपालवधाला ‘ निवृत्तीजोगा नव्हेची |’ असे उद्गार काढल्या नंतर भास्करभट उद्धवगीता लिहिण्यास प्रवृत्त झाले.
- भागवताच्या एकादशस्कंधावरील मराठीतील पहिले काव्य म्हणून त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.
- ऋष्यशृंगाच्या कथेच्या अनुषंगाने शृंगाररसाची लयलूट .
- पुरुरव्याच्या कथेच्या अनुषंगाने स्त्रीची भरपूर निर्भत्सना .
- द्वैताचे सूर आळवीत असताना अधूनमधून अद्वैताचे सूर देखील दिसतात.

# वछाहरण – दामोदर पंडित

- रचनाकाल – इ.स. १३१६ ,ओवीसंख्या- ५०३
- भागवताच्या दशमस्कंधातील १२,१३,व १४ या अध्यायातील अघासुरवध व वत्साहरणाच्या कथेचा आधार.
- आपल्या प्रबंध रचनेचे वैशिष्ट्य –
- ‘ तैसे सकौतुक श्रीकृष्णचरित्र | वर्निजैल, विचित्र
  जेणे चमत्तकरेल चित्त | संतजनांचे |’
- हरिकथेचा आस्वाद घेण्याचा अधिकार फक्त भक्तांनाच –

‘पर कुलस्त्रियेची गुणसंपत्ति | भोगावी एकेची पति
तैसी हरिकथा रसीं रति |भगतावाचौनि नाही |’

# ज्ञानप्रबोध – पंडित विश्वनाथ शके १२५३

- ओवीसंख्या – १२०४
- विश्वनाथ - चरित्र , कमलाकरांचा अनुग्रह , शिवव्यासाजवळून मंत्रोपदेश , आपल्या दोन्ही गुरूंना नमन
- ‘ तैसे मुनी कमलाकरू | लाउनी गेला बोधांकुरू |
  तो पाळिला शिवराजें उपचारु | करोनिया |
- ज्ञानप्रबोध हे गीतेच्या ५ श्लोकांवरील भाष्य
- भक्तीची व वैराग्याची शिकवण देणारा एक सलग ग्रंथ.
- यातील पहिल्या १२५ ओव्यात ‘ अमानित्वं, अदंभित्वं, अहिंसा, शांति: आर्जवम’ ही ज्ञान लक्षणे सांगणाऱ्या श्लोकांचे स्पष्टीकरण

# ज्ञानप्रबोध – पंडित विश्वनाथ

- ज्ञानेश्वरांप्रमाणे पंडित विश्वनाथ सुद्‌धा श्रोत्यांचा अनुनय करतात-
- ‘ सिद्‌धांत कर्पूरवासें | घोळून साहित्य रसें
  भावविडा प्रबंधमिषें | स्वामी देईन
  लटके वाग्जाळ | न बोले पाल्हाळ
  बोल भावगर्भ रसाळ | तैसे बोलेन’
- पंथ प्रवर्तकाचे अत्यादरपूर्वक वर्णन
- ज्ञानेश्वरांच्या शैलीची छाप
- महानुभावांच्या गीतेवरील अनेक भाष्यांपैकी फक्त ज्ञानप्रबोधलाच साती ग्रंथात स्थान

# सह्याद्रिवर्णन – रवळोव्यास शके १२५५

- पंथीय उपासकाच्या भूमिकेतून ५१७ ओव्यांचे हे काव्य रचले.
- दत्तात्रयाचे (एकमुखी दत्त) स्तोत्र असेच या ग्रंथाचे स्वरूप आहे.
- 'सह्याद्रिवर्णन' या शीर्षकाचे औचित्य
- ग्रंथारंभी – ' तया श्रीचक्रपाणिचेन : वरप्रसादे मी करीन
  मूर्ति-लीला-वर्णन: श्री दत्तात्रयाचे'
- हिराइसा उर्फ हिरांबिका ही त्याची दीक्षागुरु – 'हिरांबिकेचा सुतु : राये येणे नामे विख्यातु' असा स्वत:चा उल्लेख
- ५१७ ओव्यांच्या या काव्यात श्री दत्तात्रयांचे चरित्र फक्त १६० ओव्यात, काही ओव्यात सह्याद्रीवरील स्थानांचे

# श्रीऋद्धिपूरवर्णन - नारायण पंडित शके १२८५

- नारोव्यास बहाळिये यांनी श.१२८५ मध्ये हा ग्रंथ लिहिला तसा उल्लेख ‘ बाण अष्टयमचंद्र शोभनेसि | आथा दे निशिकर चंद्रेसि

  ग्रंथु पावला सिद्धिसि : श्रीऋद्धिपूरवर्णनु’ या ओवीतून केला आहे. ( बाण=५,अष्ट=८,यम=२,चंद्र=१ हे आकडे वामतो गति म्हणजे उलटे करून बसवले की १२८५ हा शक स्पष्ट होतो.)
- प्रारंभी परा वाचा, श्री नागांबिका,श्रीनागदेवाचार्य यांना वंदन , नंतर ‘अहिंसु नीसंगु नीवृत्त भक्तियोगु’ अशी आपल्या परमार्गाची तत्वे विशद केली आहेत.
- श्रीऋद्धिपूर येथील बारीकसारीक स्थळांचे वर्णन –

# श्रीऋद्धिपूरवर्णन - नारायण पंडित

- यातील वर्णनाला भाविकतेची व आत्मप्रत्ययाची बैठक त्यामुळे काव्यात्मता व जिवंतपणा आलेला आहे.
- काव्याच्या सातव्या प्रकरणात ग्रंथकर्त्याने 'स्वात्मनिरुपण' केलेले आहे.
- एक भाविक यात्रेकरू तीर्थयात्रेस निघाला आहे अशी कल्पना करून त्याने श्रीऋद्धिपूरवर्णन केलेले आहे.
- ' जे आर्तासि कारणे : संसार श्रमाचे वींसवणे' असे श्रीऋद्धिपूर पाहताच ' सासुरवासे सीन्नली : तीये जेवि भेटे माउली' अशी कवीची अवस्था होते.

# श्रीऋद्धिपूरवर्णन - नारायण पंडित

- श्री मूर्तीचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यावर ‘ अवलोकिता श्रीमूर्ति : न लगती नेत्रांची पातीं ते जैसे डोळे वाट दाखविती : परमसुखाची’ असा विलक्षण सुखाचा अनुभव
- अत्यंत साधी भाषा व भावनांचा प्रबळ ओघ यामुळे सारे काव्यच ‘वेधवती’ बनले आहे.
- स्थलवर्णनपर ग्रंथ असूनही कवीच्या श्रद्धेचे, आत्मप्रत्ययाचे आणि उत्कटतेचे दुवे जोडलेले असल्यामुळे सातीग्रंथात श्रीऋद्धिपूरवर्णनाचे स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण स्थान .

# धन्यवाद

